# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.06.2025** **वारःरविवार**

आकाशवाणी , माधुरी कुलकर्णी आपल्याला बातम्या देत आहे.

**ठळक बातम्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशियाच्या दौऱ्यावर

देशातल्या सर्व बोईंग सेवन एट सेवन (787) विमानांची तपासणी करण्याचे केंद्र सरकारचे निर्देश, मृतांचे कुटुंब आणि जखमींना 25 लाख रुपयांची मदत देण्याचा एअर इंडियाचा निर्णय

विद्यार्थ्यांचं परदेशी शिक्षणाचं स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

नीट युजी 2025 चा निकाल जाहीर/ महाराष्ट्रातला कृशांग जोशी देशात तिसरा

आणि

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला नमवून दक्षिण आफ्रिका विजयी.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून पाच दिवसांच्या सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यासाठी रवाना होत आहेत. सायप्रस मध्ये गेल्या 20 वर्षात भारताच्या पंतप्रधानांची ही पहिली भेट आहे. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून मोदी उद्या कॅनडाच्या कानानास्किस इथं जी-सेवन परिषदेत सहभागी होणार आहेत. इथं ते जी-सेवन देशांच्या नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा करतील, तसंच परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध द्विपक्षीय बैठकाही घेतील. शेवटच्या टप्प्यात 18 जून ला पंतप्रधान क्रोएशियाला भेट देणार आहेत. भारताच्या पंतप्रधानांनी क्रोएशियाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. क्रोएशियाचे पंतप्रधान आंद्रेज प्लेंकोविच यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करतील तसंच राष्ट्रपती ज़ोरान मिलनोविच यांची भेट घेतील.

**<u>अहमदाबादविमानअपघात</u>**

अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातानंतर देशात कार्यरत असलेल्या 34 बोईंग सेवन एट सेवन (787) विमानांचं नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून सखोल परिक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत आठ विमानांची तपासणी झाल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी काल सांगितलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या दुर्घटनेच्या

सखोल चौकशीसाठी केंद्रीय गृहसचिवांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापना केली असून, त्यात केंद्र आणि गुजरात राज्य सरकारमधल्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. या समितीला तीन महिन्यांत सर्वंकष अहवाल देण्याच्या सूचना दिल्याचंही नायडू यांनी सांगितलं.
दरम्यान, या अपघातातल्या मृतांची संख्या अडीचशेच्यावर गेली आहे. मृत प्रवाशांच्या कुटुंबियांना आणि जखमींना 25 लाख रुपये तातडीची मदत देण्याचा निर्णय एअर इंडियानं घेतला आहे. टाटा समूहानं या आधीच मृतांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यायचा निर्णय घेतला होता.

**योगकनेक्ट 2025**

एक पृथ्वी - एक आरोग्य यासाठी योगाचा अवलंब या संकल्पनेतून यंदाचा योग दिन येत्या 21 जून रोजी साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत ग्लोबल योगा समिट - योग कनेक्ट 2025 या जागतिक शिखर परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या शिखर परिषदेचं उद्घाटन काल केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झालं. भारताने जगाला दिलेल्या योगविद्येमुळे भारताची विश्व कल्याणाची आकांक्षा दिसून येत असल्याचं प्रतिपादन जाधव यांनी यावेळी केलं. योग हा धर्म, लिंग आणि भाषेच्या सीमा ओलांडून जात असल्याचं ते म्हणाले. यावर्षी योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टणम इथं होणार असून,कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत.

**11वर्षमोदीसरकार**

भारत 2029 पर्यंत जगातली  तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर वेगानं पुढे जात आहे असं  केंद्रीय जलमार्ग मंत्री सरबानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. या वेगवान प्रगतीचं श्रेय त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या गेल्या 11 वर्षांपासून असलेल्या  निर्णायक आणि भ्रष्टाचारमुक्त शासनाला दिलं आहे. एनडीए सरकारच्या 11 व्या वर्धापन दिनानिमित्त काल आसाममधल्या दिब्रूगढ़मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत आता धोरणात्मक आणि वंशवादी शासनातून  मुक्त झाला असून,  पायाभूत सुविधांच्या विस्ताराच्या दिशेनं वेगानं वाटचाल करत असल्याचं त्यांनी नमूद केलं. गेल्या 10 वर्षात देशातले , 25 कोटीं पेक्षा जास्त नागरिक दारिद्रयातून बाहेर आले आहेत तसंच 2014 या वर्षांपासून 30 हजार स्टार्टअपची संख्या, एक लाखाच्या वर गेली आहे असं ही सोनोवाल  यांनी यावेळी सांगितलं.

**परदेशीविद्यापीठ**

महाराष्ट्र शासनानं, राष्ट्रीय शिक्षण धोरणातंर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केल्यानं, भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातल्या विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचं  भारतातलं  पहिलं शैक्षणिक केंद्र नवी मुंबईत उभारण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या कार्यक्रमात पाच जागतिक विद्यापीठांना आशयपत्र प्रदान करताना ते काल बोलत होते. युनिव्हर्सिटी

ऑफ अॅबर्डीन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,आणि इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन ही विद्यापीठं भारतात येत असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय शिक्षण सचिव आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी यांच्यासह परदेशी विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**नीट2025**

वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षा नीट 2025 चा निकाल जाहीर झाला असून त्यात महाराष्ट्राच्या कृशांग जोशीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. राजस्थानच्या महेश जोशीने प्रथम क्रमांक तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा क्रमांक मिळवला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या ntaneet.nic.in या संकेतस्थळावर तपशीलवार निकाल उपलब्ध आहे. देशभरातल्या 552 आणि देशाबाहेरच्या 14 शहरांमध्ये 4 मे रोजी आयोजित केलेल्या या  परीक्षेला 22 लाखांहून अधिक उमेदवार बसले होते.

**ज्येष्ठनागरिकशोषणदिवस**

आज जागतिक ज्येष्ठ नागरिक शोषण जनजागृती दिन पाळण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिकांचं शोषण आणि त्यांच्याकडे केलं जाणारं दुर्लक्ष याविषयी जनजागृती करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं आज हा दिवस पाळण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टोल फ्री एल्डर लाईन तयार करण्यात आली असून त्यांना 14567 या क्रमांकावर मदत मिळू शकणार आहे.

**पवनदिवस**

स्वच्छ आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी आणि पवन ऊर्जेची शक्ती साजरी करण्यासाठी आज जगभरात जागतिक पवन दिन साजरा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने आज बेंगळुरूमध्ये एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. या कार्यक्रमात ग्रामीण विकास, हरित रोजगार आणि हवामान लवचिकतेमध्ये पवन ऊर्जेची भूमिका देखील अधोरेखित केली जाईल.

**ईराणइस्राइल**

इस्राइल आणि ईराण यांच्यातला क्षेपणास्त्र संघर्ष वाढला असून ,ईराणच्या क्षेपणास्त्रानी  इस्राइलच्या प्रमुख शहरांना लक्ष्य केलं आहे. तर इस्राइल च्या सैन्यांनं काल तेहरान मध्ये लष्कराच्या तळांवर हल्ले केल्यानं पश्चिम आशियाची परीस्थिति बिकट झाली आहे. इस्राइलनं इराणवर केलेल्या हल्ल्यांमध्ये इराणच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यासह ७८ जण मारले गेले आहेत. तर इराणनं इस्राइलवर केलेल्या

प्रतिहल्ल्यात इस्त्राएलच्या तीन जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. इराण आणि इस्त्राएलचे विमानतळ नागरी वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.
दरम्यान, अमेरिकेसोबत अणुकरारासंबंधात चाललेल्या चर्चेतून इराणने अंग काढून घेतलं आहे. इस्त्रायलला अमेरिकेची मदत सुरू असल्यानं अमेरिकेशी चर्चा करण्यात स्वारस्य नसल्याचं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी म्हटलं आहे.

**<u>एक्सियोम-4</u>**

भारतीय अंतराळ वीर आणि हवाई दलाचे पायलट शुभांशु शुक्ला आणि इतर 3 अंतराळवीरांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात घेऊन जाणारं यान आता 19 जून रोजी उड्डाण करणार आहे. केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी ही माहिती दिली आहे. ही मोहीम भारतासाठी महत्वपूर्ण असून, त्यामुळे शुभांशु शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणारे पहिले आणि 1984 मध्ये अंतराळात गेलेल्या राकेश शर्मा यांच्यानंतर दुसरे भारतीय ठरणार आहेत.

**<u>ISSFविश्वचषकनेमबाजी</u>**

ISSF विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत आर्या बोरसे आणि अर्जुन बबुतानं सुवर्ण पदक पटकावलं. जर्मनीतल्या म्युनिचमध्ये 10 मीटर एअर रायफलच्या मिश्र दुहेरीत त्यांनी ही कामगिरी केली. स्पर्धेतलं भारताचं दुसरं सुवर्ण आणि एकूण चौथं पदक आहे. यापूर्वी सुरूची सिंगनं सुवर्ण पदक पटकावलं असून, सिफ्ट कौर समरा आणि एलावेनिलनं कांस्य पदक जिंकलं आहे.

**<u>कसोटीक्रिकेट</u>**

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत काल अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाचा 5 गडी राखून पराभव करत अजिंक्यपद पटकावलं. 27 वर्षानंतर दक्षिण आफ्रिकेला आय सी सी ची स्पर्धा जिंकण्यात यश आलं. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी 213 धावांवरून पुढे खेळताना दक्षिण अफ्रिकेनं, सलामीवीर, शतकवीर आणि सामनावीर ठरलेल्या एडन मार्करमनं, डेव्हिड बेडिंघमच्या साथीत संघाला विजयाच्या समीप नेऊन ठेवलं. कर्णधार बावूमानं 66 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून कॅगिसो रबाडानं 9 गडी बाद केले.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**